क्र.२/नमवि/प्रशासक/ ०२ / २०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २८ जून २०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०२/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०१/०७/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१०/०६/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील सुंदर पार्क ते वृंदावन कॉलनी मयुर हाडको ते आरवाडे पार्क या परिसरास कोतवाले मळा असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२१/०६/२०२४ चे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१९ विश्रामबाग येथील गणपती मंदिराचे पुढील बाजूच्या एस.टी.कॉलनीकडे जाणाऱ्या व शंभर फुटी रस्त्यास छेद देत असणाऱ्या चौकास स्वा.विनायक दामोदर सावरकर चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२१/०६/२०२४ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील दडगे प्लॉट जुना स.नं.३०३/२ मधील नागरिक या भागातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक आप्पासाहेब बाळा दडगे नाव जाफरी स्ट्रीट रस्त्याच्या पुर्व बाजूच्या चौकास जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक आप्पासाहेब बाळा दडगे असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१४ मधील सराफ कट्टा येथील दक्षिण उत्तर रस्त्यास कै.नाना शंकर शेठ असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

...२...

६. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील आप्पासाहेब बिरनाळे पब्लिक स्कूल ते स्टेट बँक कॉलनी/हाडको कॉलनीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील स.नं.२४४/३ येथील मनपा आपेन स्पेसला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले इको लायब्ररी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिका क्षेत्रातील न्यु.प्राईड मल्टीप्लेक्स सांगली समोरील मा.आयुक्तसो यांचे बंगल्यास उर्जा असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्षेत्रातील रघुवंश हौसिंग सोसा. मधून श्री.जिव्हेश्वर भवन शेजारुन जाणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्यास श्री.जिव्हेश्वर पथ असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग, सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१०. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार लागू करणेस धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

११. महानगरपालिका क्षेत्रातील श्री.गणेश मार्केट,सांगली दुकान गाळे संरक्षणासाठी बांधलेल्या पोलिस चौकीचे विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार मे.पोलिस अधिक्षक,सांगली यांना करारपत्र व ताबा करुन देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१२. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली इस्लामपुर जुना जकात नाका येथील १० मीटर X १४ मीटर मापाची जागा भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड मॅनेजर सांगली, सातारा यांना विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस व किमान मुल्यांकन रु.४०,०००/- वर्ष इतके करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१३. महानगरपालिका क्षेत्रात भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड मॅनेजर,सांगली,सातारा यांना विषयपत्रातील नमुद सहा ठिकाणच्या ५.०० मीटर X ६.०० मीटर जागा विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस व त्यांचे भाडे मुल्यांकन निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१४. महानगरपालिका क्षेत्रातील लहान दुकान गाळे, वारसांना खोकी/दुकान गाळे मा.महासभा ठराव क्र.१४५ दि.२०/१२/२०१९ व प्रशासक ठराव क्र.६२ दि.०४/०१/२०२४ नुसार होणाऱ्या हस्तांतरण फी नुसार मालमत्ता व्यवस्थापक यांचे अंतर्गत हस्तांतरण करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१५. महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टी भरताना गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यास नोंद करणाऱ्या नळ कनेक्शन धारकांना देय रक्कमेत सवलत देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.२७/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१६. महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य विभागाकडे दैनंदिन कचरा संकलन कामी लिटर पीकर वाहने नाविन्यपुर्ण योजनेमधून खरेदी करणेस व त्याकामी येणारे र.रु.२,७८,१०,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव पाठविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.२४/०६/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१७. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुदी या योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील विषयपत्रातील नमुद मंजुर एकूण ६४ कामांचा र.रु.१५,००,००,०००/- मात्रचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव पाठविणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२७/०६/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१८. मिरज हायस्कुल मिरज कडील श्री.देवेश लक्ष्मण नलवडे, कनिष्ठ लिपीक यांनी चित्रकला परिक्षा शुल्क रक्कमेचा अपहार केले प्रकरणी मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांच्या आदेशानुसार निलंबित करणेत आलेले असून, श्री.नलवडे यांची सदर गुन्हाबाबत चौकशी करणेसाठी त्रीसदस्य चौकशी समिती गठीत करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मिरज हायस्कूल, मिरज) यांचे दि.१९/०६/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१९. केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई.बस सेवा योजना अंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस मंजुर झालेल्या ५० ईलेक्ट्रीक बसेस परिचलन करण्याकरीता येणाऱ्या खर्चास व याकामी प्राप्त ठेकेदार मे.JBM Ecolife Mobbility Pvt.Ltd. यांना मंजुर दरानुसार LOA देण्यास व इतर अनुषंगिक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

२०. महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम MRDP या र.रु. ४७६.८३ कोटी च्या प्रकल्पासाठी PMC नियुक्त करणेस व प्रकल्पाच्या शासन मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

२१. मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ करीता र.रु.२४.३९ कोटी इतका वाढीव निधी मिळणेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणे तसेच प्राप्त होणाऱ्या निधीमधून खर्चासाठी मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १७ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१०/०६/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०१ ते १६ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १८ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२१/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील सुंदर पार्क ते वृंदावन कॉलनी मयुर हाडको ते आरवाडे पार्क या परिसरास कोतवाले मळा असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १९ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२१/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१९ विश्रामबाग येथील गणपती मंदिराचे पुढील बाजूच्या एस.टी.कॉलनीकडे जाणाऱ्या व शंभर फुटी रस्त्यास छेद देत असणाऱ्या चौकास स्वा.विनायक दामोदर सावरकर चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २० **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील दडगे प्लॉट जुना स.नं.३०३/२ मधील नागरिक या भागातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक आप्पासाहेब बाळा दडगे नाव जाफरी स्ट्रीट रस्त्याच्या पुर्व बाजूच्या चौकास जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक आप्पासाहेब बाळा दडगे असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २१ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१४ मधील सराफ कट्टा येथील दक्षिण उत्तर रस्त्यास कै.नाना शंकर शेठ असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधीक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २२ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील आप्पासाहेब बिरनाळे पब्लिक स्कूल ते स्टेट बँक कॉलनी/हाडको कॉलनीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २३ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील स.नं.२४४/३ येथील मनपा आपेन स्पेसला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले इको लायब्ररी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(सुधाम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २४ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील न्यु,प्राईड मल्टीप्लेक्स सांगली समोरील मा.आयुक्तसो यांचे बंगल्यास उर्जा असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधीक्षक

महापालिका सचिव
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २५ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग, सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील रघुवंश हौसिंग सोसा. मधून श्री.जिव्हेश्वर भवन शेजारुन जाणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्यास श्री.जिव्हेश्वर पथ असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २६ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्रमांक आंनियो १००५/१२६/सेवा ४ दिनांक ३१ आक्टोंबर २००५ रोजीचे शासन निर्णयान्वये ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, निवृत्तीवेतन योजने ऐवजी, केंद्र शासनाच्या धर्तीवर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली होती. त्यानुसार सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमध्ये ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचारी यांना राज्य शासनाच्या धर्तीवर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे.

तद्नंतर सन २०१५ पासून (DCPS) योजना केंद्र शासनाच्या नविन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) मध्ये वर्ग केली आहे. परंतु महापालिका स्तरावर सदरची योजना राबविताना एक वाक्यता दिसून येत नसल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११९/नवि-२० दि.२२/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकांमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हितासाठी वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व महानगरपालिकामध्ये एकसुत्रीकरण राहण्याच्या अनुषंगाने सर्व महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करणेबाबत सदरच्या शासन निर्णयामध्ये विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून लागू करण्यात आली आहे. या अनुषंगाने सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार लागू करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सहा. आयुक्त/प्रशासन अधिकारी (आस्था.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २७ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील श्री.गणेश मार्केट,सांगली दुकान गाळे संरक्षणासाठी बांधलेल्या पोलीस चौकीचे विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार मे.पोलीस अधिक्षक,सांगली यांना करारपत्र व ताबा करुन देणेस मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरची पोलीस चौकी ही पोलीस अधिक्षक यांना हस्तांतरीत न करता भाडे तत्वावर फक्त वापरणेसाठी देणेत यावे. याकरीता सदर जागेचे भाडे मूल्य ठरवून घेणे, विद्युत बिलाचा खर्च पोलीस विभागाने भरणे यासह शर्ती-अटी निश्चित करुन पोलीस अधिक्षक,सांगली यांना करारपत्र व ताबा देणेसाठी फेरप्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २८ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली इस्लामपुर जुना जकात नाका येथील १० मीटर X १४ मीटर मापाची जागा भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड मॅनेंजर सांगली, सातारा यांना विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस व किमान मुल्यांकन रु.४०,०००/- वर्ष इतके करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर जागेवर भूमिगत बांधकामा व्यतिरिक्त जमिनीवरील बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही तसेच गॅस पाईप लाईनचे दर अंतिम करणे, यासह शर्ती-अटींचा समावेश करुन बांधकाम, नगररचना विभाग यांच्या ना-हरकतसह सदरचा प्रस्ताव फेर सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली अतिरिक्त

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २९ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रात भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड मॅनेंजर,सांगली,सातारा यांना विषयपत्रातील नमुद सहा ठिकाणच्या ५.०० मीटर X ६.०० मीटर जागा विषयपत्रातील नमुद शर्ती-अटीनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस व त्यांचे भाडे मुल्यांकन निश्चित करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर जागेवर भूमिगत बांधकामा व्यतिरिक्त जमिनीवरील बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही तसेच गॅस पाईप लाईनचे दर अंतिम करणे, यासह शर्ती-अटींचा समावेश करुन बांधकाम, नगररचना विभाग यांच्या ना-हरकतसह सदरचा प्रस्ताव फेर सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३० **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील लहान दुकान गाळे, वारसांना खोकी/दुकान गाळे हस्तांतरण करणेस दरसुधार समितीने मान्यता दिलेनुसार खालील प्रमाणे मा.महासभा ठराव क्र.१४५ दि.२०/१२/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

अ.क्र.	बाब	महासभेने निश्चित केलेले दर
१.	लहान दुकान गाळा ६ X ७ स्के.फुट (मनपाचे एस.एफ.सी.शेजारील बांधीव संकुल)	२३८०/- स्के.फुट
२.	व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र.१० X १२ स्के.फुट	२,५०,०००/- प्रति गाळा
३.	खोक्यासाठी व पुनर्वसन गाळ्यांसाठी	३०,०००/-
४.	वारसांना खोकी हस्तांतरण	१०,०००/-
५.	वारसांना दुकान गाळे हस्तांतरण	१५,०००/-

उपरोक्त मा.महासभा ठरावामध्ये प्रशासक ठराव क्र.६२ दि.०४/०१/२०२४ अन्वये खोकी/ पुनर्वसन गाळे हस्तांतरण करणेसाठी खालील प्रमाणे कपात करणेस मान्यता दिलेली आहे.

अ.क्र.	मालमत्तेचा प्रकार	शुल्क	सध्या आकारण्यात येणारे शुल्क र.रु.	सुधारीत शुल्क र.रु.
१.	खोकी	विक्री भाडे/हस्तांतरण शुल्क	३०,०००/-	२०,०००/-
		वारसा हक्काने हस्तांतरण शुल्क	१०,०००/-	७,५००/-
२.	पुनर्वसन गाळा	विक्री भाडे/हस्तांतरण शुल्क	९९,६००/-	८०,०००/-
		वारसा हक्काने हस्तांतरण शुल्क	१५,०००/-	१२,५००/-

तसेच, मा.महासभा ठराव क्र.१८४ दि.२२/०१/२०२४ अन्वये दुकान गाळे,खोकी,खोकी पुनर्वसन गाळे / वारस हस्तांतरण करणेचे अधिकार मा.स्थायी समितीला प्रदान करणेत आलेले असून सध्या मा.स्थायी समितीची मुदत संपलेली असल्यामुळे सदरची बाब ही आर्थिक उत्पन्नाशी निगडीत असल्याने, महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील लहान दुकान गाळे, वारसांना खोकी/दुकान गाळे हस्तांतरण करणेस मा.महासभा ठराव क्र.१४५ दि.२०/१२/२०१९ अन्वये व प्रशासक ठराव क्र.६२ दि.०४/०१/२०२४ अन्वये दिले मान्यतेनुसार हस्तांतरण शुल्क प्रमाणे मालमत्ता व्यवस्थापक यांचे अंतर्गत हस्तांतरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा तत्वत: मान्यता देत आहे.

तथापि, उपरोक्त हस्तांतरण शुल्क हे मालमत्तेच्या शिघ्रशिर्ष गणकानुसार (रेडीरेकनर) भाडे मुल्य निश्चित करुन, त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुढील महासभेस सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३१ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.२७/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांसाठी पाणीपट्टी भरण्यासाठी या वर्षापासून ऑनलाईन पेमेंट ऑप्शन उपलब्ध करुन देण्यात येत असून, सदर नळ कनेक्शन धारकाचा इमेल आय.डी. व मोबाईल नंबर प्राप्त होणार असलेने वेळोवेळी पाणी देयका संबंधीची अद्यावत माहिती देणे सोईस्कर होणार असल्याने, जे नळ कनेक्शन धारक पाणीपट्टी देयक तसेच रक्कम भरल्यानंतर मिळणाऱ्या पावतीची हार्ड कॉपी घेण्याऐवजी गो ग्रीन सुविधे अंतर्गत ई-बील व ई-रिसिटसाठी नोंद करतील अशा नळ कनेक्शन धारकांना पाणी देयकामध्ये र.रु.१०/- इतकी सवलत देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

पाणी पुरवठा अधिक्षक (पा.पु.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३२ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- १६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.२४/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार एकुण लोकसंख्या ५,०२,७९३, एकुण वॉर्ड संख्या २०, एकुण क्षेत्रफळ ११८.१८ चौ.कि.मी., तसेच व्यापार क्षेत्र व वाढणारे स्थावर मालमत्ता व नवनविन विकसीत होणारे नागरी क्षेत्र याबाबींचा विचार करता, महानगरपालिका सार्वजनिक रस्त्यावर पडणारा दैनंदिन कचरा उठाव करणेसाठी पुरेसे मनुष्यबळ व स्वतंत्र वाहनाची व्यवस्था नाही. त्यामुळे कचरा उठाव करणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे शहर सौंदर्याच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या तक्रारी या सर्व बाबींचा विचार करुन छोट्या आकाराच्या हेवी व्हॅक्युम प्रणाली वापरुन कचरा सक्शन करणारी व्हेईकल मांऊटेड मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे जलद व कमी मन्युष्यबळ वापरुन स्वच्छता करता येणार आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणारा कचरा दैनंदिन उठाव करण्यासाठी वरील प्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त कचरा संकलन वाहने खेरदीसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत मा.कामगार मंत्री तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांनी सुचित केले आहे. त्यास अनुसरुन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी नाविन्यपुर्ण योजनेतुन सांगली विभागासाठी २ नग मिरज विभागासाठी २ नग व कुपवाड विभागासाठी १ वाहन असे एकुण ५ वाहनांचा परिपुर्ण प्रस्ताव तयार करुन जिल्हा नियोजन समिती सांगली यांचेकडे सादर करणेबाबत दि.२१/०६/२०२४ रोजी आदेश दिले आहेत.

महानगरपालिका कार्यक्षेत्राचा विचार करता डिझेल इंजिन ऑपरेटेड टाटा ईन्ट्रा/ अशोक लेलँड दोस्त/ किंवा इतर वाहनावर ओला व सुका कचरा सक्शन करणारे मशीन (लिटरपीकर) १.५ Cum क्षमता असणारे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या मशीनचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या व GeM पोर्टलवर उपलब्ध मशीनचे दरपत्रक घेवुन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	वाहनप्रकार	दर	नग	एकुणर.रु.
१	डिझेल इंजिन ऑपरेटेड व्हेईकल माऊंटेड ड्राय अॅन्ड व्हेटगार्बेज सक्शन मशीन (लिटरपीकर) १.५ Cum	५५,६२,०००	५	२,७८,१०,०००
अक्षरीर.रु.-दोन कोटी अष्ठयाहत्तर लाख दहाहजार मात्र.				

वरील प्रमाणे ५ नग लिटर पीकर वाहन खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे र.रु.२,७८,१०,०००/- मात्रचा प्रस्ताव नाविन्यपुर्ण योजनेतुन मंजुरीसाठी जिल्हा नियोजन समिती यांचेकडे प्रस्तावित करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

मेकॅनिकल इंजिनिअर (कार्यशाळा)

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३३ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- १७

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२७/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.मनपा-२०२४/प्र.क्र.४०(१३/ नवि-१६ (ई-७३१३७१) दि.२९/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुदी या योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील एकूण ६४ कामांचा र.रु.१५,००,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मंजूर झाला असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग असून, सदर शासन निर्णयानुसार शासन अनुदान १००% आहे. सदर निर्णयान्वये मंजुर कामे खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रू.(लक्ष)
१.	प्रभाग क्र.१ रामकृष्णनगर शिवमंदीर आय टी आय कॉलनी येथे गटर बांधकाम करणे	२५.००
२.	प्रभाग क्र.१ बुधगावरोड गणेशनगर मधील पुर्व - पश्चिम रस्ता व गटर करणे.	२३.००
३.	प्रभाग क्र.१ आयटीआय कॉलनी मधील रस्ते विकसित करणे	२३.००
४.	प्रभाग क्र.१ प्रकाशनगर गल्ली नं.३ १०० फुटी रोड ते प्रकाश लवटे घररस्ता विकसित करणे	१५.००
५.	प्रभाग क्र.१ वर्धमाननगर शंकर मंदीर परिसर कंपाऊंड करणे व परिसरातील रस्ते विकसित करणे.	२५.००
६.	प्रभाग क्र.२ मधीलमहेबुब मुल्ला घर ते हॉटेल परिवर्तन (सागर माने) घरापर्यंत रस्ता विकसित करणे.	१८.००
७.	प्रभाग क्र.८ डतुळजाईनगर येथील माळी मंगल कार्यालय रोड ते प्रणव अपार्टमेंट पर्यंत रस्ताविकसित करणे.	२४.००
८.	प्रभाग क्र.८ ड मधील ८० फुटी रोड प्रणव पर्ल ते पोतदार हायस्कूल पर्यंत रस्ता करणे.	२४.००
९.	प्रभाग क्र.९ रानडेमळा अभयनगर येथील पूर्वेस असणारा ८० फुटी रस्ता स्वातंत्रवीर सावरकर क्रिडांगणते माने घर पर्यंत गटर करणे.	२०.००
१०.	प्रभाग क्र.९ कोटीभास्कर घर ते सचिन ज्वेलर्स पर्यंत गटर करणे	२०.००
११.	प्रभाग क्र.९ मधील सरस्वतीनगर येथील चंदूकाका सराफ ते राधास्वामी सस्तंग पर्यंतचा रस्ता विकसित करणे.	२०.००
१२.	प्रभाग क्र.९ मधील सरस्वतीनगर येथील राधास्वामी सत्संग ते संजय डोडिया रामकृष्ण घरापर्यंत रस्ता विकसित करणे	२०.००
१३.	प्रभाग क्र.१० टिंबरएरिया येथील मेहता हॉस्पिटल मारूती गाडे चौक ते शांती निवास पर्यंतचा रस्ताविकसित करणे.	१७.५०
१४.	प्रभाग क्र.१० मधीलटिंबर एरिया येथील शांती निवास ते मिरा हौसिंग सोसायटी पर्यंतचा रस्ता विकसितकरणे.	१७.५०
१५.	प्रभाग क्र.१२ मधील पंचशिलनगर येथील मेंडगुळे प्लॉट, रेपेप्लॉट, जाधव प्लॉट येथील रस्ते व गटरकरणे.	२०.००

... २ ...

१६.	प्रभाग क्र.१२ मधील कर्नाळ रोड दत्तनगर येथे गल्ली नं.१ मधील सतिश कुकडे घर ते हनुमंत कोरे यांचे घरापर्यंत रस्ता विकसितकरणे.	२०.००
१७.	प्रभाग क्र.१२ मधीलजाकवेल नदीकडील रस्ता विकसित करणे.	२०.००
१८.	प्रभाग क्र.१३ सांगलीवाडी येथील संदीप पाटील घर ते बालचित घर रस्ता सुधारणा करणे.	१७.५०
१९.	प्रभाग क्र.१४ मधील विवेकानंद मंडळ ते सतीश पवार घर ते कबाडे बोळ ते खाली सरकारी घाट रस्ता विकसित करणे.	१५.००
२०.	प्रभाग क्र.१४ मधीलजोशी गल्ली येथील रस्ते करणे.	
२१.	प्रभाग क्र.१४ मधीलहरिदास कार्यालय रोड रस्ता विकसित करणे.	१६.५०
२२.	प्रभाग क्र.१४ मधीलस्वामी समर्थ कॉलनी काळीवाट २२८/३ अ येथील रस्ता विकसित करणे.	३०.००
२३.	प्रभाग क्र.१४ मधीलसाई मंदीर समोरील काळीवाट रस्ता सुधारणा करणे.	३०.००
२४.	प्रभाग क्र.१६ मधीलस्टेशन रोड आशिर्वाद लॉज ते विहार हॉटेल पर्यंत आर सी सी३ फुटी गटर करणे.	२०.००
२५.	प्रभाग क्र.१७ मधीलकुंटे मळा अंतर्गत शितल पाटील घर ते अवधुत मोरे घर रस्त्यास दोन्ही बाजुसआर.सी.सी.गटर करणे	३०.००
२६.	प्रभाग क्र.१७ मधीलकुंटे मळा अंतर्गत ललीतकुमार दबडे घर ते खोत घर रस्त्यास दोन्ही बाजुसआर.सी.सी.गटर करणे.	३०.००
२७.	प्रभाग क्र.१७ मधीलकुंटे मळा अंतर्गत महावीर Fabrication ते विद्या पाटील घर रस्त्यास दोन्हीबाजुस आर.सी.सी गटर करणे.	३०.००
२८.	प्रभाग क्र.१७ मधीलकुंटे मळा अंतर्गत ३ रस्ते विकसित करणे.	३०.००
२९.	प्रभाग क्र. १८ गजराज कॉलनी गल्ली नं.३ गिरीजा हॉटेल ते आपटे घर गटरकरणे.	१३.००
३०.	प्रभाग क्र. १८ शांतीनाथनगर, कर्वे मळा, कोल्हापुर रोड येथील अंतर्गत रस्ते करणे.	१५.००
३१.	प्रभाग क्र.१८ रामनगरगल्ली नं. ६ आर.सी.सी.गटर करणे.	३०.००
३२.	प्रभाग क्र.१८ सांगलीकोल्हापुर रोड सुभाष नगर येथील अंतर्गत रस्ते विकसित करणे.	३०.००
३३.	प्रभाग क्र.१८ गंगाधरनगर मधील अंतर्गत रस्ते विकसित करणे.	३०.००
३४.	प्रभाग क्र. १८ विठ्ठलनगर गल्ली नं. ३ व ४ येथील अंतर्गत रस्ते करणे.	२०.००
३५.	प्रभाग क्र. १८ कोल्हापुर रोड ७ अव्हेन्यु मॉल ते हरिपुर काळीवाट रस्ताकरणे	४५.००
३६.	प्रभाग क्र. १८ जाधव रेशन दुकान ते बाळूमामा मंदीर पर्यंत रस्ता करणे	१२.००
३७.	प्रभाग क्र. १८ महादेव कॉलनी शामराव नगर गल्ली नं. १ येथील रस्ते करणे	१४.००
३८.	प्रभाग क्र.१९ मधीलमहालक्ष्मी चौक ते राजू कदम घर रस्ता डांबरीकरण करणे.	२५.००
३९.	प्रभाग क्र. १९ हसनी आश्रम मागे चिदानंद गोडसे घर ते अमोल सुतार घरापासूनरजपुत घरापर्यंत रस्ता करणे.	२०.००
४०.	प्रभाग क्र. १९ श्रीराम नगर गल्ली नं.5 वानलेसवाडी सांगली येथील रस्ताकरणे व सी डी वर्क बांधणे.	१५.००
४१.	प्रभाग क्र. १९ मधील पुजारी प्लॉट विठ्ठल मंदीर रोड रस्ता करणे.	२८.००
४२.	प्रभाग क्र. १९ हसनी आश्रम जवळ चंद्रलोक अपार्टमेंट श्रीरामनगर १० वी व ११ वी आर्या हॉटेल समोरील रस्ता करणे.	
४३.	प्रभाग क्र.१ अंकूरसोसायटी अंतर्गत स.नं.२५०/४ शासकीय जागेत संरक्षक भिंत बांधणे.	२५.००
४४.	प्रभाग क्र.१ वसंतनगरअंतर्गत रस्ते व रस्त्यालगतच्या जागेत सुधारणा करणे.	२३.००

४५.	प्रभाग क्र.१ यशवंतनगर अंतर्गत रस्ते व रस्त्यालगतच्या जागेत सुधारणा करणे.	२३.००
४६.	प्रभाग क्र.१ ज्योर्तिलिंगहौसिंग सोसायटी पोलीओ सेंटर जवळ मेन रोड यशवंतनगर येथील रस्ते व गटर करणे.	३०.००
४७.	प्रभाग क्र.१ एकताकॉलनीमधील रस्ते डांबरीकरण करणे.	६०.००
४८.	प्रभाग क्र.११ मधील अंतर्गत रस्ते करणे.	२५.००
४९.	प्रभाग क्र.८ विद्यानगरगल्ली नं.८ ते ओंकार अपार्टमेंट पर्यंत पी.सी.सी.गटरबांधकाम करणे.	१०.००
५०.	प्रभाग क्र.८ वारणालीविद्यानगर गल्ली नं.२ येथीलदत्त दिगंबर अपार्टमेंट ते ओम शांती ओम पर्यंत गटर करणे.	१२.००
५१.	प्रभाग क्र.८ मधीलविकास कॉलनी येथील जाधव घर ते वास्तुपुरम अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता डांबरीकरणकरणे.	१०.००
५२.	प्रभाग क्र.८ शाहुनगरयेथील संजीवनी अपार्टमेंट ते डॉ.भिंगारदिवे बंगल्यापर्यंत पुर्व - पश्चिम रस्ताकरणे.	३५.००
५३.	प्रभाग क्र.०८ शाहूनगरयेथील सतगुरू अपार्टमेंट ते श्री.कांबळे साहेब, जोशी ब्रदर्स बंगल्यापर्यंत दक्षिणोत्तररस्ता करणे.	१५.००
५४.	प्रभाग क्र. ८ मधील जिजामाता हौसिंग सोसायटी येथील ८० फुटी रोड ते चैत्रबननाल्यापर्यंत रस्ता करणे.	६०.००
५५.	प्रभाग क्र.१० मधीलव्यंकटसृष्टी जवळील सुमती अपार्टमेंट परिसरातील रस्ते सुधारणा करणे.	३०.००
५६.	प्रभाग क्र.१० मधीलन्यु हायस्कूल परिसरातील रस्ते व गटर करणे.	२०.००
५७.	प्रभाग क्र.१० माकडवालेकुंची कोरवी समाज येथील अंतर्गत गटर करणे.	१०.००
५८.	प्रभाग क्र. १० गजेंद्र गाडे घर ते गुरूव्दार पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरणकरणे.	२०.००
५९.	प्रभाग क्र. १२ मधील जाकवेल रोड गोवर्धन चौक ते जुना पद्माळे चौक दोन्हीबाजुस आर.सी.सी.गटर करणे.	३०.००
६०.	प्रभाग क्र. १२ जुना बुधगाव रोड वरील लक्ष्मीनगर अंतर्गत रस्ते करणे.	२५.००
६१.	प्रभाग क्र.१२ मॉडर्नस्कूल कडे जाणारा आजिंक्यनगर येथील अंतर्गत रस्ते करणे.	५०.००
६२.	प्रभाग क्र.१२ मधीलमाधवनगर जकात नाका ते पद्माळ रोड कृष्णाईनगर, गजराज कॉलनी, सुशांत गार्डन शेजारील भागात रस्ते व गटरकरणे.	४०.००
६३.	प्रभाग क्र.१२ मधीलसाईनाथ नगर गल्ली नं.१ येथीलविराचार्य उद्योग समुह ते मुल्ला घर रस्ता व एक बाजुने पी.सी.सी.गटर करणे.	१५.००
६४.	प्रभाग क्र.१२ पर्चेशिलनगरशिंदे मळा व समाज कल्याण शेजारील कलानगर कडे जाणारा रस्ता करणे.	३४.००
	एकूण र.रु.	**१५००.००**

महानगरपालिका क्षेत्रातील उपरोक्त मंजुर ६४ कामांपैकी काम क्र.२८ व ६२ ही ०२ कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) DPDC मधून मंजूर असून, काम क्र.५४ हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज व मनपा निधीतून सुरु आहे. सदरची ०३ कामे मंजुर असल्याने, मंजुर ६४ कामांपैकी काम क्र.२८,६२ व ५४ ही तीन कामे वगळून उर्वरित ६१ कामांचा एकूण र.रु.१३.७० कोटी चा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. All pages signed.

शहर अभियंता

महापालिका, सांगली

(शुभम गुप्ता, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३४ **दिनांक** :- ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- १८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त (मिरज हायस्कूल, मिरज) यांचे दि.१९/०६/२०२४ रोजीचे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मिरज हायस्कूल, मिरज कडील कनिष्ठ लिपीक श्री.देवेश लक्ष्मण नलवडे यांनी चित्रकला परिक्षा शुल्क रक्कमेचा अपहार केले प्रकरणी मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांच्या दि.२६/०२/२०२४ रोजीच्या आदेशाने मा.उपायुक्त तथा प्रशासक मिरज हायस्कूल मिरज यांच्या जा.क्र.१२१/२०२३-२४ दि.२७/०२/२०२४ रोजीच्या व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ व त्याखालील नियमावली मधील नियम ३३ अन्वये व नियमावली १९८१ नुसार निलंबित केले आहे.

मा.उपायुक्त तथा प्रशासक, मिरज हायस्कूल मिरज यांनी श्री.देवेश लक्ष्मण नलवडे यांच्या चौकशी कामी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करणेसाठी प्रशासन अधिकारी, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, शिक्षण विभाग यांची संस्था प्रतिनिधी म्हणून चौकशी समिती निमंत्रक, राज्य पुरस्कार प्राप्त सहाय्यक शिक्षक श्री.आदम अली मुजावर आणि अपचारी कर्मचारी यांचे प्रतिनिधी अशी नियुक्ती केली आहे. तसेच, श्री.राजेंद्र नागरगोजे, मुख्याध्यापक मिरज हायस्कूल मिरज यांची सदर समितीचे व्यवस्थापन प्रतिनिधी म्हणून पुढील कामकाजासाठी नियुक्ती केलेली आहे.

वरील प्रमाणे महानगरपालिकेचे मिरज हायस्कूल मिरज कडील अपचारी कर्मचारी श्री.देवेश नलवडे यांच्या चौकशी कामी गठीत करणेत आलेल्या चौकशी समितीस आणि त्या अनुषंगाने अपचारी कर्मचारी यांची चौकशी करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

मुख्याध्यापक, मिरज हायस्कूल, मिरज

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३५ **दिनांक :-** ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- १९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

केंद्र शासनाने घोषित केलेल्या पी.एम.ई-बस सेवा योजनेमध्ये केंद्र शासनाच्या निवड सुचीनुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी १०० बसेस मंजुर करण्यात आल्या आहेत. मनपा क्षेत्राची भौगोलिक व आर्थिक परिस्थिती पाहता दिनांक ०९/१०/२०२३ रोजीच्या सहमती पत्रामध्ये १२ मिटर लांबीच्या २० बसेस व ९ मिटर लांबीच्या ३० बसेसची मागणी करण्यात आली आहे. मा.शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ५० बसेसच्या पार्किंग, सर्व्हिसिंग, चार्जिंग स्टेशन व डेपोसाठी मिरज मेडिकल ग्राऊंड लगतची महानगरपालिकेची खुली जागा (१३९०० चौ.मि.) सि.स.नं. ९/२/३/४ ती योग्य असलेबाबत तत्कालीन आयुक्तसो यांनी सुचविले आहे. त्यानुसार जागा निश्चित करण्यात आली आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई-बस सेवेत सहभागी होणेस तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार या योजने बाबत राज्य शासन वेळोवेळी निर्गमित करेल त्या सुचनानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यास व योजनेकरीता आवश्यक निधी वेळेत उपलब्ध करुन देणे या आशयाचे सहमती पत्र मा.आयुक्तसो सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी दिले आहे. सदर योजने अंतर्गत मे.Convergence Energy Services Ltd. (CESL) यांचे मार्फत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. व पी.१एम. ई-बस सेवा स्किम पार्ट १, २.१.५ अन्वये Escrow Account च्या माध्यमातुन दैनंदिन आर्थिक व्यवहार होणार आहेत.

पी.एम.ई-बस योजने अंतर्गत वेळोवेळी व्ही.सी.मिटींग मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार स्थानिक विज पुरवठा कंपनी MSEDCL, शासन नियुक्त सर्व्हे टिम CESL यांचे प्रतिनिधी, मनपा शहर अभियंता व मनपा कार्यकारी अभियंता विदयुत यांचेकडुन Behind the meter bus power infrastructure plan व bus infrastructure Depot plan तयार करण्यात आलेला आहे. त्यास तांत्रिक मान्यता घेवुन मा.शासनास सादर करण्यात आला. त्यास मा.शासनाच्या दि.१३/०६/२०२४ रोजीच्या १३ व्या बैठकी मध्ये मान्यता मिळाली असुन बैठकीच्या इतिवृत्ता मध्ये खालील प्रमाणे निधी मंजुर झाला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस सेवा Civil Work

अ. क्र.	कामाचे नाव	तांत्रिक मान्यता र.रु.	मंजुर र.रु.	केंद्र शासन हिस्सा र.रु.(६०%)
१	मनपा हद्दितील ई-बस सेवा अंतर्गत बस डेपोचे बांधकाम करणे (Civil Infrastructure)	११,१३,७६,४९२/-	९,५४,००,०००/-	५,७२,००,०००/-

केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस सेवा Electric work १००% केंद्रीय मदत निधी

अ. क्र.	कामाचे नाव	तांत्रिक मान्यता र.रु.	मंजुर र.रु.
१	महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडुन आवश्यक विद्युतीकरण करणे. HT Power line	३,५३,२४,०१२.७२	३,२७,००,०००/-
२	बस डेपोचे अंतर्गत विद्युतीकरण करणे. LT side Infrastructure	२,४४,४८,३१५/-	२,३६,००,०००/-

... २ ...

दि.२४/०२/२०२४ रोजीच्या मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्रानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहीत कालावधीत पुर्ण होण्याचे दृष्टीने पीएम ई-बस सेवा योजने अंतर्गत स्थापत्य व विद्युत कामाची निविदा प्रक्रिया केंद्रीय अर्थसहाय्य प्रत्यक्ष उपलब्ध होण्याची वाट न पाहता प्राधान्याने राबवावी व तशा सुचना महावितरण कंपनी शासन स्तरावर देण्यात आल्या आहेत असे नमुद आहे. त्यास अनुसरुन वरील नमुद कामांच्या निविदा प्रक्रिया तातडिने राबविण्याबाबत कार्यकारी अभियंता MSEDCL, शहर अभियंता व विद्युत अभियंता यांना उपायुक्त तथा नोडल अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांनी पत्राने कळविले आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका बस सेवेस मंजुर झालेल्या १२ मिटर ई-बसेस करीता प्रति कि.मी. रु.२४/- व ९ मिटर ई-बसेस करीता प्रति कि.मी. रु.२२/- इतकी केंद्रीय मदत (Central Assistance for bus operations) प्रति तिमाही अनुदान स्वरुपात पुढील १० वर्षाकरीता प्राप्त होणार आहे. मे.Convergence Energy Services Ltd. (CESL) यांच्या मार्फत GCC तत्वावर ई-बसेस परिचलन व परिरक्षण करणेकामी महाराष्ट्र राज्या करीता मागविण्यात आलेल्या एकुण १२९० ई-बसेसच्या निविदांमध्ये L१ निविदाकार मे. JBM Ecolife Mobility Pvt. Ltd. यांना मिळाली असुन त्यांचे प्रति कि.मी. दर खालील प्रमाणे आहे.

अ .क्र.	बसचा प्रकार	RFP नुसार मंजुर Assured km per month	प्रति कि.मी. दर र.रु.	केंद्रिय मदत प्रति कि.मी. र.रु.	मनपास प्रति कि.मी. दयावा लागणारा दर.र.रु.	मनपास होणार एकुण मासिक खर्च र.रु.
१	१२ मिटर २० ई-बसेस	६००० कि.मी. (प्रतिदिन २०० कि.मी. प्रमाणे)	७०.९४	२४.००	४६.९४+ (वाहक व इतर खर्च रु.१२) ५८.९४	७०,७२,८००
२	०९ मिटर ३० ई-बसेस	५४०० (प्रतिदिन १८० कि.मी. प्रमाणे)	६३.४५	२२.००	४१.४५+ (वाहक व इतर खर्च रु.१२) ५३.४५	८६,५८,९००
					५० ई-बसेस करीता एकुण मासिक खर्च र.रु.	१,५७,३१,७००

वरील प्रमाणे सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस ५० ई-बसेस करीता अंदाजे र.रु.१,५७,३१,७००/- इतका मासिक खर्च होणार असुन वार्षिक खर्च अंदाजे र.रु.१८,८७,८०,४००/- इतका येत आहे.

पी.एम.बस सेवा योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या ५० ई-बसेसचा वापर सुरु झाल्यावर खाली नमुद केल्या प्रमाणे उत्पन्न अपेक्षित आहे.

अ.क्र.	बसचा प्रकार	सरासरी उत्पन्न प्रतिदिन प्रति बस	दिवस	महानगरपालिकेस प्राप्त होणारे अपेक्षित मासिक उत्पनन र.रु.
१	१२ मिटर २० ई-बसेस	६०००	३०	३६०००००
२	०९ मिटर ३० ई-बसेस	६०००	३०	५४०००००
		५० ई- बसेस करीता एकुण मासिक उत्पन्न र.रु.		९०,००,०००
		वार्षिक उत्पन्न र.रु.		१०,८०,००,०००

वरील प्रमाणे ५० ई-बसेस पासुन अंदाजे वार्षिक उत्पन्न र.रु.१०,८०,००,००/- इतके अपेक्षित आहे. केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा अंतर्गत ५० बसेस वेटलिज पध्दतीने परिचलन व परिरक्षण करणेचा खर्च सन २०२४-२५ या वर्षातील महानगरपालिका अंदाजपत्रकात ५ इतर योजना ई-११२२ पीएम ई-बस सेवा योजना मनपा हिस्सा लेखाशिर्षामधुन खर्च होणार आहे.

उपरोक्त ५० बसेस करीता होणारा एकुण खर्च व प्राप्त होणारे वार्षिक उत्पन्न पाहता अंदाजे र.रु.८,०७,८०४,००/- इतकी वार्षिक तुट अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या शासन निर्णय एन.यु.आर.-२०१३/ प्र.क्र.३३८/ नवि-३३ दि.१८/०२/२०१४ नुसार परिवहन उपक्रमांना वेटलिजमध्ये येणारी बस संचलन व दुरुस्तीच्या खर्चातील तुट (Operational loss) संबंधीत महानगरपालिकांनी सोसावेत असे आदेश आहेत. त्यानुसार या योजनेमध्ये येणारी वित्तीय तुट महानगरपालिकेस अदा करावी लागणार आहे. त्यानुसार वेटलिज ठेक्याअंतर्गत वित्तीय तुट महानगरपालिकेने दरमहा देणेस व त्याप्रमाणे प्रतिवर्ष महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पात आवश्यकती तरतुद करणे आवश्यक आहे.

सद्या सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेत स्वतंत्र परिवहन सेवा कार्यरत नाही. व महानगरपालिकेस परिवहन सेवेचा अनुभव नाही त्यामुळे या योजनेत येणारी आव्हाने व बस व्यवस्थापन करण्यासाठी गृह निर्माण आणि शहरी मंत्रालय (MOHUA) यांना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना ईलेक्ट्रीक बस मार्ग नियोजन वेळापत्रक चार्जिंगसह, बस ऑपरेशन्स, कॉन्ट्रॅक्ट मॅनेजमेंट याकामी PMC नियुक्ती करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे विषयपत्रातील शिफारशीनुसार,

१. सदर प्रस्तावात नमुद केलेल्या सर्व बाबी व त्या अनुषंगाने येणारा अपेक्षित खर्च, लागु होणारे कर यास वित्तीय व प्रशासकिय मान्यता देणे,
२. ठेकेदार मे. JBM Ecolife Mobility Pvt. Ltd. यांना मंजुर दर १२ मिटर ई-बसेस करीता प्रति कि.मी. रु.७०.९४ व ९ मिटर ई-बसेस करीता रु.६३.४५ नुसार Letter of Award (LOA) देणे व आवश्यक करारपत्र करणे,
३. सि.स.नं. ९/२/३/४ मनपाची खुली जागा बस डेपोसाठी विकसित करणे,
४. उपरोक्त योजनेच्या अंमलबजावणीकरीता PMC नियुक्ती करणे

वरील प्रमाणे कामगिरी करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मेकॅनिकल इंजीनियर (कार्यालय)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३६ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- २०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/०७/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जागतिक बँक व महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्रा यांचेवतीने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट मनपा क्षेत्रातील ११ नाल्यांचे खोलीकरण,रुंदीकरण,पक्के बांधकाम करणे,नाल्यावरील असलेले अतिक्रमण हटविणे, छोटे पुल बांधणे, भोबे टापई गटरी बांधणे या गटारीत येणाऱ्या पावसाचे पाण्याचा निचरा करणेसाठी शामरावनगर मध्ये दोन ठिकाणी पंपींग स्टेशन बांधणे याद्वारे मनपा क्षेत्रातील नागरी वस्तीत पाणी साचून न राहता ते गतीने नदीत वाहते व्हावे यासाठी उपाय योजना करण्यात करण्यात येणार आहेत. यासाठी र.रु.४७६.८३ कोटी प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करण्यात आला आहे. यापुर्वी नियुक्त PMC यांचेकडून सदर प्रस्ताव तयार करणेत आला आहे.

सदर नमुद कामामुळे महानगरपालिका क्षेत्रातील पावसाचे पाणी व सांडपाण्याचा निचरा होण्यास मदत होवून त्यामुळे परिसरात साचलेल्या पाण्यामुळे डासोत्पत्ती कमी होऊन नागरिकांचे सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने दिलासा मिळणार आहे.

सदर प्रस्तावाची एकुण प्रकल्प किंमत र.रु.४७६.८३ कोटी मात्र इतकी आहे. सदर प्रकल्प हा जागतिक बँक व महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन मित्रा यांचे मदतीने राबविण्यात येणार असून या प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे.

उपरोक्त कामाचा DPR तयार करणेसाठी मे.संदिप गुरव अॅड असोसिएटस यांची PMC म्हणून नेमणूक करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.२०९ दि.२३/०४/२०२१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

वरील प्रमाणे विभागाकडून सादर झालेल्या प्रस्तावानुसार, महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) या प्रकल्पास मे.संदिप गुरव अॅड असोसिएटस यांची PMC म्हणून नियुक्ती करणेस तसेच प्रकल्पाच्या शासन मंजुरीसाठी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(सुधाम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३७ **दिनांक** :- ०१/०७/२०२४

विषय क्रमांक :- २१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ च्या मिरज भुयारी गटर योजना टप्पा क्र.२ करिता वाढीव निधी मिळणेबाबतच्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

उपरोक्त योजनेला रुपये ५६.५३ कोटी इतक्या किमतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर योजनेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग सांगली हे प्रकल्प व्यवस्थापन सेवा सल्लागार आहेत. महानगरपालिकेने वरील योजनेच्या कामासाठी ५३.६८% जादा दराने निविदा स्विकृत करुन ठेकेदार एसएमसी इन्फ्रा. प्रा.लि. ठाणे यांची नियुक्ती केली आहे. योजनेची स्विकृत निविदा किंमत रु. ७७.५४ कोटी इतकी आहे. (५३.६८% Above Cost put to Tender & ९.७२% Above the Current Cost of Tender as Evaluated by MJP) सन २०१३-१४ दर सुचिनुसार सध्या योजनेचे काम प्रगतीत असून कामाची भौतिक प्रगती ९५% इतकी झाली आहे. योजना कार्यान्वयाच्या अंतिम टप्प्यात आहे.

मिरज भुयारी गटार योजनेवरील एकूण खर्चामध्ये वाढ झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी उपांग निहाय खालील प्रमाणे जादा खर्चाचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

योजनेवरील खर्चाचा गोषवारा खालील प्रमाणे,

योजनेची मंजूर किंमत	:- रु. ५६.५३ कोटी
स्विकृत निवेदीची किंमत	:- रु. ७७.५४ कोटी
निविदेवरील अद्यावत खर्च	:- रु. ७९.०३ कोटी
योजनेवरील अद्यावत खर्च	:- रु. ८२.५२ कोटी
उर्वरित कामांसाठी आवश्यक खर्च	:- रु. १९.४१ कोटी
योजनेवर होणारा एकूण अपेक्षित खर्च	:- रु. १०१.९३ कोटी
योजनेवर होणारा अतिरिक्त खर्च	:- रु. २४.३९ कोटी

उर्वरित कामे :- सद्यस्थितीत प्रामुख्याने मलनि:सारण नलिकांच्या एकूण २०८० मीटर गॅपचे काम, दाबनलिकेचे 600 मीटर इतके काम, टिंबर व समता नगर पंपींग स्टेशन येथील पंपींग मशिनरी व अनुषंगीक कामे, इत्यादी कामे करणे बाकी आहे. तसेच बेडग रस्त्यावरील मलशुध्दीकरण केंद्र क्षमता २२.५ MLD हे काम पुर्ण झाले असून विद्युत पुरवठा प्राप्त झाला आहे. माहे मे अखेर कार्यान्वित करणेत येणार आहे.

मिरज भुयारी गटार योजना वाढीव खर्चाची सविस्तर कारणे.

१) समतानगर व टिंबर एरिया येथील पंपींग स्टेशनच्या जागा बदलल्यामुळे, त्यावर अवलंबून ट्रंक मेन व दाबनलिका याच्या लांबीमध्ये वाढ झाली.

२) मलशुध्दीकरण केंद्राच्या डिस्पोजल व्यवस्थेसाठीची निविदेतील तरतूद, २०० मीटर इतकी होती. प्रत्यक्षात 700 मीटर इतक्या अंतरापर्यंत, ओढ्यामध्ये नेवून पाणी सोडावे लागल्याने, एकंदरच कामांमध्ये वाढ झाली.

३) विद्यानगर भागामध्ये अपेक्षेपेक्षा जास्त कठीण भूस्थर व खोली असल्याने, तरतुदीपेक्षा जास्त खर्च झाला.

४) निविदेतील डीवॉटरिंगची तरतूद, प्रत्यक्ष काम करताना कमी पडल्याने, एकंदर परिमाणात वाढ होवून, अतिरिक्त खर्च झाला.

५) निविदे व्यतिरिक्त काही ठिकाणी जादा सिवर लाईन्स टाकण्यात आल्या उदा. अष्टविनायक कॉलनी, विद्यानगर.

६) मुळ मंजूर प्रकल्पामध्ये सिवर लाईन्सच्या प्रमाणात रुंदीनेच रस्त्यांच्या पुनर्पृष्ठीकरण तरतूद होती, मात्र प्रत्यक्षात विविध भूस्थर व खोलींवर कामे करताना, पुर्ण रुंदीने रस्ता खराब असल्याने व त्यासाठी नागरिका/ स्थानिक लोकप्रतिनिधींचा प्रचंड आग्रह असल्याने, पुर्ण रुंदीने केल्यामुळे एकंदरीतच खर्चात वाढ झाली.

७) टिंबर एरिया पंपींग स्टेशन येथे अंदाजे 15 मीटर खोलीवर काम प्रगतीत असताना, शेजारीच असणारे अस्तित्वातील पंपींग स्टेशन, बहूतांशी प्रत्येक मंगळवारी लाईट गेल्यानंतर, ओव्हर फ्लो होवून, तेथील सांडपाणी सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी आल्यामुळे, काम करण्यास विलंब पण झाला व त्यामुळे तेथील सांडपाणी उपसा करण्यात अतिरिक्त खर्च झाला.

८) मुळ मंजूर प्रकल्पामध्ये व निविदेमध्ये रेल्वे क्रॉसिंगच्या कामाचा समावेश नव्हता, तथापी मिरज जंक्शनमध्ये दोन ठिकाणी ट्रेंचलेस पध्दतीने, त्यांचे खात्याकडे भरणा करावयाच्या रक्कमेसह, जादा खर्च करावा लागला.

९) मुळ मंजूर योजनेमध्ये ट्रेंचलेस पध्दतीने खोदकाम करण्याचा समावेश नव्हता, तथापी मिरज शहरातील हेवी ट्रॅफिक, युटिलिटीच्या अडचणी, काळी माती इत्यादी तांत्रिक अडचणींमुळे, ट्रेंचलेस पध्दतीने खोद काम करुन, काम करणे भाग पडले त्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली.

१०) मंजूर योजनेत तसेच निविदेमध्ये समतानगर व टिंबर एरिया पंपींग स्टेशन येथे, मेकॅनिकल स्क्रिनचा समावेश नव्हता, मात्र देखभाल दुरुस्तीसाठी सदर बाब अत्यावश्यक असल्याने, अतिरिक्त खर्च होणार आहे.

[ब] कामा व्यतिरिक्त इतर अतिरिक्त खर्चाचा तपशिल :-

सदर योजनेचे मुळ मंजूर किंमतीमध्ये, भाववाढ, जीएसटी ई. कर, पीएमसी चार्जेस, याचा समावेश नाही. त्यामुळे सदरचा खर्च अतिरिक्त झाला / होणार आहे. जादा खर्चाचा प्रस्ताव मागणी केली असून त्या नुसार निविदेवरील खर्चामध्ये वाढ होत असल्याबद्दल, मजीप्राने सां. मि. कु. शहर महानगरपालिकेला वेळोवेळी अवगत केलेले आहे. सन २०१३ पासून प्रगती असलेली योजना पुर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. सद्यस्थितीत योजनेचे ९५% काम पुर्ण असून योजना कार्यान्वयाच्या अंतिम टप्प्यात आहे.

... ३ ...

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सांगली यांनी मिरज भुयारी गटार योजनेवर एकूण खर्चामध्ये वाढ झाली आहे. तसे त्यांनी उपांगनिहाय विवरण पत्र मा. आयुक्तसो, यांना दि.२६/१२/२०२२ रोजी सादर केले आहे. अद्याप या योजनेवर एकूण र.रु.८२.५२ कोटी इतका खर्च झाला आहे. ज्यामध्ये भाववाढ व जी.एस.टी. चा समावेश झाला आहे. या कामाची एकूण भौतिक प्रगती ९५% पुर्ण झाली आहे. तसेच बेडग रोड येथे २२.५ क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्रास विद्युत पुरवठा मिळाला असून लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येणार आहे.

या योजनेचे बचत वाढ विवरण पत्र तयार करुन ही योजना पुर्ण करण्यासाठी अजून र.रु. २४.३९ कोटी मंजूर योजनेपेक्षा जादा खर्च होणार आहे. सोबत भाववाढ विवरण पत्र, मुळ प्रशासकीय मान्यता, योजनेची तांत्रिक मान्यता तसेच आवश्यकती कागदपत्रे लगत करुन मिरज भुयारी गटार योजना कार्यान्वित व पुर्णत्वास करणेसाठी सां.मि.कु मनपासाठी र.रु. २४.३९ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असलेने निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव इकडील कार्यालयाकडून जा.क्र. मनपा/सां/जलवि /३१/२०२३-२४ दि.१७/०४/२०२३ अन्वये तसेच जा.क्र. मनपा/सां/जलवि /१४४/२०२४-२५ दि.१२/०६/२०२४ अन्वये मा.प्रधान सचिवसो, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे.

सदर कामगिरीचा खर्च मा. शासनाकडून प्राप्त होणाऱ्या र.रु.२४.३९ कोटी निधीमधून होणेचा आहे.

वरील प्रमाणे मिरज भुयारी गटर योजना टप्पा क्र.२ च्या शासनाकडून प्राप्त होणाऱ्या वाढीव निधीतून र.रु.२४.३९ कोटी खर्चासाठी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

All pages signed,

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (जाकवि)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका